


# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जनहितार्थ माहिती सादर

# नागरिकांसाठी आजारांबद्दल मराठीत माहिती २०२५



श्री. प्रकाश आबिटकर
माननीय मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण महाराष्ट्र राज्य

# स्वाइन फ्लू (H1N1) बद्दल माहिती




## स्वाइन फ्लू म्हणजे काय?

स्वाइन फ्लू हा H1N1 विषाणूमुळे होणारा फ्लूचा प्रकार आहे. तो संक्रमित व्यक्तीच्या शिंकेद्वारे, खोकल्यातून किंवा स्पर्शातून पसरतो.



## ❓ लक्षणे कोणती असतात ?

उत्तर:
- ताप (102–104°F)
- सर्दी, खोकला, घसादुखी
- अंगदुखी, डोकेदुखी
- मळमळ, उलट्या, अतिसार
- थकवा, श्वास घेण्यास अडचण
- काही वेळा न्यूमोनिया किंवा ब्रॉन्कायटिस होऊ शकतो

## ❓ कोणाला अधिक धोका असतो ?

उत्तर:
- ५ वर्षांखालील मुले
- ६५ वर्षांवरील वृद्ध
- गर्भवती महिला
- मधुमेह, हृदयरोग, अस्थमा, किडनी विकार असलेले रुग्ण
- इम्युनिटी कमी असलेले रुग्ण

## ❓ कसा पसरतो ?

उत्तर:
- संक्रमित व्यक्तीच्या शिंकेद्वारे किंवा खोकल्यातून
- संक्रमित वस्तूंना हात लावून नाक , तोंड, डोळ्यांना स्पर्श केल्यास
- गर्दीच्या ठिकाणी संपर्कातून



❓ **उपचार काय आहेत ?**

उत्तर: - Tamiflu आणि Zanamivir ही अँटीव्हायरल औषधे
- तापासाठी पॅरासिटामॉल
- भरपूर पाणी , सूप, फळांचे रस
- गंभीर स्थितीत हॉस्पिटलायझेशन आणि IV fluids

❓ **टाळण्यासाठी काय उपाय करावेत ?**

उत्तर: - मास्क वापरा
- हात वारंवार धुवा
- गर्दी टाळा
- सर्दी-खोकला असल्यास घरीच थांबा
- दरवर्षी फ्लूविरोधी लसीकरण करा - विशेषतः उच्च-धोका गटासाठी

❓ **कधी डॉक्टरांकडे जावे ?**

उत्तर: - ताप ३ दिवसांपेक्षा जास्त टिकल्यास
- श्वास घेण्यास अडचण , छातीत दुखणे
- उलट्या , अतिसार , थकवा
- लहान मुले , वृद्ध , गर्भवती महिलांमध्ये लक्षणे दिसल्यास